# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय

## ४१२, ई शिवाजीनगर पुणे - ४११ ०१६

☎२५६५६२३४ फॅक्स २५६५६२३४ E-Mail – ropune@dtemaharashtra.gov.in


जा.क्र.तंशिविकापु/आस्था-१/२०२०/ ८२६ दिनांक : 14 FEB 2020

प्रति,
संचालक / प्राचार्य
सर्व शासकीय पदवी व पदविका संस्था
पुणे विभाग

विषय – कंत्राटी/ हंगामी अध्यापकांच्या सेवा नियमित करण्याच्या चौकशीबाबत...

संदर्भ – १. मा.संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय,मुंबई यांचे पत्र क्र.४अ/आस्था/२०२०/ ३९ दिनांक २३/०१/२०२०
२. या कार्यालयाचे पत्र क्र.तंशिविकापु/आस्था-१/२०२०/४६६ दिनांक २३/०१/२०२०

उपरोक्त संदर्भ क्र.१ अन्वये आदेशित केल्याप्रमाणे, संदर्भ क्र.२ अन्वये आपल्या संस्थेतील तत्कालिन कंत्राटी अधिव्याख्यात्यांनी घेतलेल्या पदव्युत्तर अभ्यासक्रमाबाबतची माहिती मागविण्यात आलेली होती. तद्नुषंगाने आपल्या संस्थेची माहिती या कार्यालयांस प्राप्त झालेली आहे. परंतु सदर माहितीची पडताळणी केली असता, माहितीतील विवरणपत्रानुसार आवश्यक ते आदेश/ दस्तऐवज हे सादर करण्यात आलेले नाहीत. तसेच काही अध्यापकांचे बाबतीत एकही दस्तऐवज सोबत जोडलेला नाही. त्यामुळे सादर केलेल्या माहितीची पडताळणी करणे अडचणीचे होते आहे.

सबब आपणांस कळविण्यात येते की, सदर माहिती ही संचालनालयांस तसेच चौकशी अधिकारी यांना सादर करावयाची असल्यामुळे माहिती ही अचूक सादर होणे अनिवार्य आहे. तद्नुषंगाने आपणांस कळविण्यात येते, संदर्भ क्र.२ अन्वये आपण सादर केलेली माहिती ही अचुक असलेबाबत खालीलप्रमाणे प्रमाणपत्र १ भरुन या कार्यालयांस सादर करावे.

तसेच रकाना क्र.९ ते १३ मधील माहिती ही संबंधित अध्यापकांकडून प्रमाणित करुन घ्यावी. व सर्व प्रमाणपत्रे या कार्यालयांस दिनांक १५/०२/२०२० पुर्वी हस्तदेय पोच करण्यात यावीत.

Gaikwad १४.२.२०२०
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
पुणे

प्रत- संगणक विभाग यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.

Endorsement

# प्रमाणपत्र – 1
## (संस्थाप्रमुखांनी द्यावयाचे )

प्रमाणित करण्यात येते की, मा.संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय,मुंबई यांचे पत्र क्र.४अ/आस्था/२०२०/३९ दिनांक २३/०१/२०२० व या कार्यालयांचे पत्र क्र.तंशिविकापु/आस्था-१/२०२०/४६६ दिनांक २३/०१/२०२० अन्वये "तत्कालिन कंत्राटी अधिव्याख्यात्यांनी घेतलेल्या पदव्युत्तर अभ्यासक्रमाबाबतची मागविण्यात आलेली माहिती ही या कार्यालयाचे पत्र क्र .........................दिनांक ......... अन्वये आपले कार्यालयांस सादर करण्यात आलेली आहे. तसेच सदर केलेली माहिती ही अचुक आहे.

संस्थाप्रमुखांची स्वाक्षरी

संस्थेचे नांव

Endorsement

# प्रमाणपत्र - २

(संबंधित अध्यापकांकडून घ्यावयाचे )

१. अध्यापकांचे नांव ,पदनाम, कार्यरत संस्था –

२. उमेदवाराची पदव्युत्तर शैक्षणिक अर्हता –

३. पदव्युत्तर शैक्षणिक अर्हता धारण करण्याचा दिनांक –

४. पदव्युत्तर अभ्यासक्रम पूर्ण केला आहे – (पूर्णवेळ / अर्धवेळ)-

५. कोणत्या विद्यापीठ/महाविद्यालयातून पदव्युत्तर अभ्यासक्रम पुर्ण केला –

६. कार्यरत संस्था व पदव्युत्तर अभ्यासक्रमांस प्रवेश घेतलेल्या संस्था यामधील अंतर –

७. कार्यरत कालावधीतील पदव्युत्तर अभ्यासक्रमाकरिता रजा घेतली होती काय? –

उपरोक्त सादर केलेली माहिती ही अचूक आहे.

दिनांक -

अध्यापकांची स्वाक्षरी

Endorsement